२९-२१३४

क्र. उसं/आस्था-१/अराप/नाईक/ता ज्येसू/२०१६
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई-३२,
दूरध्वनी:- २२०२९०८६, फॅक्स:- २२०२६८२६
ई-मेल:- diestt@maharashtra.gov.in

दिनांक:- 17 MAR 2016

**विषय:- उद्योग संचालनालयातंर्गत मुख्यालय व मुंबई प्राधिकरण विभागातील 'नाईक' (गट-ड) या संवर्गाची दि. ०१/०१/२०१६ रोजीची तात्पूरती (Provisional) ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याबाबत**

संदर्भ:- १.सा.प्र.वि, शा.नि क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१/१०/२०११

## परिपत्रक

शासन सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबतचे सर्वकष धोरण संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहे. त्यानुसार परिशिष्ट 'ब' मधील उदाहरण क्र. '६' नुसार दि. १.१.२०१६ रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक ज्येष्ठतासूची तयार करावयाची आहे. दि. १.१.२०११, १.१.२०१२, १.१.२०१३, १.१.२०१४, १.१.२०१५ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूचीत समावेश असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, मृत्यू, राजिनामा व अन्य कारणांमुळे दि. ३१.१२.२०१५ रोजी सेवेत नसलेल्या तसेच **वरिष्ठ पदावर नियमित पदोन्नतीमुळे** दि. ३१.१२.२०१५ रोजी या संवर्गात कार्यरत नसलेल्या कर्मचाऱ्यांची नावे वगळण्यात आलेली आहेत. दि. १.१.२०१५ ते ३१.१२.२०१५ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसह दि. ३१.१२.२०१५ रोजी या संवर्गात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा या ज्येष्ठतासूचीत समावेश करण्यात आला आहे.

सदर जेष्ठतासूची मध्ये काही वास्तविक चुका अथवा त्रुटी राहिल्या असतील तर त्याबाबतची लेखी अभिवेदने संबंधितांनी प्रस्तुत परिपत्रक प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या कालावधीत योग्य त्या सर्मथनासह उद्योग उप संचालक (आस्थापना-१) मुख्यालय, मुंबई यांना सादर करावीत. विहित मुदतीत कोणतेही आक्षेप आस्थापना-१ शाखेस प्राप्त न झाल्यास संबंधितांचा काहीही आक्षेप नाही असे गृहीत धरुन ज्येष्ठतासूची

अंतिम करण्यात येईल तसेच अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या कर्मचाऱ्यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर ''**नाईक' या संवर्गाच्या** तात्पूरती ज्येष्ठतासूची बाबतचे परिपत्रक संचालनालयाच्या www.industry.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच मुख्य कार्यालयाच्या ई-मेल वरती उपलब्ध आहे.

सहपत्र:- विहित प्रपत्र 'अ'

प्र. अतिरिक्त उद्योग संचालक
यांचे मान्यतेने

(वि.मु.सिरसाठ)
उद्योग उप संचालक(आस्थापना-१)

प्रत रवाना:-
१) उद्योग सह संचालक, मुं.प्रा.वि, मुंबई (ई-मेल द्वारे)
२).मुख्यालयातील सर्व शाखा (ई-मेल द्वारे)
३) संबंधित कर्मचारी---------------------------------------------
४) पदोन्नती कक्ष/नियुक्ती कक्ष, आस्थापना शाखा, मुख्य कार्यालय.

दि. १.१.२०१६ रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक ज्येष्ठतासूची
शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१-१०-२०११ सोबतचे प्रपत्र "अ"
उद्योग संचालनालयातंर्गत मुख्यालय व मुंबई प्राधिकरण विभागातील "नाईक" या सवंर्गाची
दिनांक ०१/०१/२०१६ रोजीची तात्पूरती (Provisional) ज्येष्ठता सूची

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | नांव | प्रवर्ग (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्ती चा मार्ग (सरळसेवेने / मर्यादीत विभागीय परीक्षेद्वारे नियुक्त उमेदवारा चा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष | ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्ती चा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभि-प्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | १ | श्री. भ.बा. जाधव | भ.ज (ब) वैध | ०५/५/१९५९ | १७/८/१९८१ | पदोन्नती | ०५/२/२०१४ | ३१/५/२०१९ | नववी पास | -- |
| २. | २ | श्रीम .श.द.नार्वेकर | खुला | २७/४/१९६३ | १५/०२/१९८२ | पदोन्नती | ०२/१२/२०१३ | ३०/४/२०२३ | चवथी पास | -- |



(वि.मु.सिरसाठ)
उद्योग उप संचालक (आस्थापना-१)

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | ३ | श्री.श.गो.लाड | खुला | २७/१२/१९६० | १६/८/१९८३ | पदोन्नती | ०२/१२/२०१३ | ३१/१२/२०२० | सातवी पास | -- |
| ४. | ४ | श्री.प्र.शं.कदम | खुला | २३/०१/१९६६ | ०२/१/१९८५ | पदोन्नती | ०२/१२/२०१३ | ३१/०१/२०२६ | नववी पास | -- |
| ५. | ५ | श्री. म.शि. पडवळ | भ.ज (ब) वैध | ०१/६/१९६५ | १९/६/१९८५ | पदोन्नती | २१/१०/२०१५ | ३१/५/२०२५ | नववी पास | -- |
| ६. | ६ | श्रीम. प्रि.प. कांबळे | अनु जाती वैध | १५/१२/१९६७ | १२/३/१९८७ | पदोन्नती | २१/१०/२०१५ | ३१/१२/२०२७ | आठवी पास | -- |

(वि.मु.सिरसाठ)
उद्योग उप संचालक (आस्थापना-१)